# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 31/07/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. सावनेर :- फिर्यादी/पिडीता वय १५ वर्ष यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे अप. क्र. ४७०/२२ कलम ३५४, ३५४(अ), ३२३, ५०६, २९४ भादंवि. सहकलम ८, १२ पोक्सो ७५ आय टि ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादीचा **आरोपी नामे- गणेश उर्फ जरक्या सुरेश चौधरी, वय ४२ वर्ष रा. टाकळी भन्सारी सावनेर** हा वडील असुन यातील पिडीत फिर्यादी ही घरी एकटी असता आरोपीने दात घासण्याचा नस मागण्याच्या बहाण्याने फिर्यादीला जवळ बोलावुन आरोपीने अश्लील हावभाव केले व आरोपीने पिडीतेच्या मनावर लज्जा उत्पन्न होईल असे कुत्य केले. पिडीतेने विरोध केला असता अश्लील भाषेत बोलुण शिवीगाळ करूण मारहाण केली.

सदर प्रकरणाचे तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम पो.स्टे. सावनेर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ३१/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश मा. डी. जे. ११ शेन्डे मॅडम न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३५४ भादंवि मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व ९०००/- रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद. कलम ३५४(अ) भादवि. मध्ये २ वर्ष सश्रम कारावास व कलम ३२३ भादवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/-रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती गवळी मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस हवालदार मधुकर आदमने पो.स्टे. सावनेर यांनी मदत केली आहे.

## विनयभंग

पो.स्टे. वेलतूर :- दिनांक २९/०७/२०२३ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादीची अल्पवयीन पिडीत मुलगी वय १४ वर्श ७ महिने ही आपले घरी एकटी हजर असतांना नमूद आरोपी नामे- अजय जगदीश नान्हे, वय १९ वर्ष, रा. ठाणा, ता. कूही, जि. नागपूर याने तिचे घरात प्रवेश करुन तिचा हात पकडून घरातील बाजूच्या खोलीत नेवून तिचा विनयभंग केला दरम्यान फिर्यादी हे घरी आले असता आरोपी हा त्यांना पाहून तिथून पळून गेला.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(अ), ४५२, भा. द. वि. सहकलम ८, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पी. एस. ओ. पाटील मो. नं. ८८०५२५३९८२ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. सावनेर: –** पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांचा मुलगा वय १२ वर्ष हा दि. २९/०७/२०२३ रोजी ०९/३० वा. दरम्यान घरी नोटबुक परत करून येतो असे सांगुन घरून निघुन गेला आहे. तिचा सदर परिसरात शोध घेतला असता तसेच मित्राकंडे शोध घेतला विचारपुस केली असता मिळुन आला नाही तरी कोणीतरी व्यक्तीने फुस लावुन मुलाला पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश राय मो. नं. ७८२०८९७१२० हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा नवरगाव व तितुर शेत शिवार येथे दिनांक २९/०७/२०२३ चे २०.०० वा. ते दिनांक ३०/०७/२०२३ चे ०५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– कुमारेश शंकरराव अवचट, वय ६१ वर्ष, रा. प्लाट नं. ४०० सुभान नगर पाण्याच्या टाकीजवळ एच बी टाऊन चौक नागपुर यांचे १८ एकर शेत नवरगाव येथे असुन गोपाल रतिराम घरत यांना ठेक्याने दिली आहे. फिर्यादीला ठेकेदार गोपाल रतिराम घरात याचा फोन आला कि तुमच्या घरातील इतर वस्तु व बाहेर ठेवलेले लोखंडी सामान चोरून नेले. फिर्यादीने शेतात येवुन पाहिले असता फिर्यादीला घराचे समोरील लाकडी दरवाजाचा लॉक जवळुन तोडलेला दिसला व आतमध्ये जावुन पाहीले असता १) ०३ चना कट्टे किंमती अंदाजे ६०००/– रू. २) ०२ सोयाबीन कट्टे किंमती अंदाजे ४०००/– रू. ३) ०६ सल्फेट बॅग किंमती अंदाजे ३०००/–रू., ४) २४ स्प्रीकलर फवारे किंमती अंदाजे ५०००/– रू. ५) जुनी बिगडलेली सबमर्शीबल मोटार किंमती अंदाजे १०००/– रू. ६) ०२ इलेक्ट्रीक स्टार्टर व मेन किंमती अंदाजे १०००/–रू. ७) इन्वर्टर मशीन व बॅटरी किंमती अंदाजे १०,०००/– रू. ८) ०४ सी सी टी व्ही कॅमरे, डीव्ही आर मशीन किंमती अंदाजे ५०००/– रू. ९) ताराचा बंडल किंमती अंदाजे १०००/–रू. १०) ०२ ठिंबक फिल्टर किंमती अंदाजे २०००/–रू. ११) बैलाचे सजविण्याचे साहीत्य पितळचे चाळ घटी घंगरू अंदाजे किंमती २०००/– रू, १२) घरासमोर ठेवलेले लोखंडी बंडीचे लोखंडी चाक किंमती अंदाजे २०००/–रू. १३) लोखंडी पलंग किंमती अंदाजे ७००/– रू. १४) ०१ लाकडी सोफा सेट किंमती अंदाजे ५०००/– रू. १५) फार्महाउस मध्ये लावलेले सीलींग ०४ फॅन किंमती अंदाजे २०००/–रू. असा एकुण ४९७००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक गुरपुडे मो. नं. ९५५२५३१००२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**